परिपत्रक क्र. ४४

इ. १० वी आणि इ.१२ वी विशेष सराव
सन २०१७-२०१८.

# रयत शिक्षण संस्था, सातारा

कर्मवीर समाधी परिसर,सातारा

**माध्यमिक आस्थापना परीक्षा विभाग**

**परिपत्रक क्र. ४४ दिनांक २८ /११ /२०१७**

**योग्य त्या कार्यवाहीसाठी**

सर्व शाखाप्रमुख,
माध्यमिक विद्यालये व माध्यमिक विद्यालयास संलग्न असलेली सर्व उच्च माध्यमिक विद्यालये.
रयत शिक्षण संस्था.

यांचेकडे ----

वरील विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, संस्थेने दिनांक २१/१२/२०१७ ते २३/१२/२०१७ या कालावधीत (१) इ.१० वी विशेष सराव परीक्षा A,B,C,D कोडप्रमाणे तसेच (२) इ.१२ वी विशेष सराव परीक्षा दिनांक २३/१२/२०१७ रोजी A,B,C,D कोडप्रमाणे घेण्याचे निश्चित केले आहे. त्याचे वेळापत्रक खालीलप्रमाणे -

| अ.नं. | वार | दिनांक | विषय | वेळ | गुण |
|---|---|---|---|---|---|
| अ) इ.१० वी विशेष सराव परीक्षा | | | | | |
| १) | गुरुवार | २१/१२/२०१७ | बीजगणित | सकाळी ८-०० ते १०-०० | ४० |
| २) | शुक्रवार | २२/१२/२०१७ | भूमिती | सकाळी ८-०० ते १०-०० | ४० |
| ३) | शनिवार | २३/१२/२०१७ | इंग्रजी | सकाळी ११-३० ते २-३० | ८० |
| ब) इ.१२ वी विशेष सराव परीक्षा | | | | | |
| १) | शनिवार | २३/१२/२०१७ | इंग्रजी | सकाळी ११-३० ते २-३० | ८० |

**महत्वाचे :-** वरील वेळापत्रकाप्रमाणे A,B,C,D कोडप्रमाणे आपल्या विद्यालयात सदरच्या परीक्षा घ्याव्यात. सदरच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वाटपाचे काम खाली दिलेल्या सूचनेनुसार करावे.

## परीक्षा बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिका वाटप :-

प्रश्नपत्रिका A,B,C,D कोडप्रमाणे असल्यामुळे एस.एस.सी. बोर्ड परीक्षेच्या धर्तीवर विशेष सराव परीक्षेची बैठक व्यवस्था व प्रश्नपत्रिकांचे वाटप करण्यात यावे.

संस्थेच्या पाचही विभागीय कार्यालयांनी त्या त्या विभागाची संबंधित शाखांची इ. ५ वी ते इ.१० वी पहिल्या सत्र परीक्षेची इयत्तावार व विषयवार प्रश्नपत्रिका मागणी संस्थेकडे केलेली होती. तसेच संस्थेच्या माध्यमिक विद्यालयास संलग्न असलेल्या सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांनी इ.११ वी, १२ वी पहिल्या सत्र परीक्षेच्या वेळी इयत्तावार व विषयवार प्रश्नपत्रिकांची मागणी संस्थेकडे केलेली होती. सदर मागणीनुसार खालीलप्रमाणे प्रश्नपत्रिकांची पूर्तता केली जाईल.

अ) इ.१० वी विशेष सराव परीक्षेच्या ३ विषयांच्या आणि सेमी.इंग्रजी माध्यमाच्या २ विषयाच्या A,B,C,D कोडप्रमाणे,

ब) इ.१२ वी विशेष सराव परीक्षा इंग्रजी या विषयाची A,B,C,D कोडप्रमाणे,

क) आपल्या विद्यालयाच्या प्रश्नपत्रिका छापून घेऊन त्या विभागीय कार्यालयाकडे दिनांक १८ डिसेंबर, २०१७ पर्यंत रयत प्रिंटिंग प्रेस, सातारा/अहमदनगर यांचेमार्फत पोहोच केल्या जाणार आहेत.

आपल्या विभागीय कार्यालयामार्फत सदरच्या प्रश्नपत्रिका संबंधित शाखांना/गटप्रमुखांना योग्य त्या वेळी घेऊन जाणेबाबत योग्य त्या सूचना दिल्या जातील. त्यानुसार आपण आपले गटप्रमुखाशी संपर्क साधून योग्य ती कार्यवाही करावी. तसेच सदरच्या परीक्षा योग्य प्रकारे पार पाडल्या जातील असे पहावे.

**महत्त्वाची सूचना :-**

१) सदरच्या विशेष सराव परीक्षेस आपल्या शाखेतील १०० टक्के विद्यार्थी उपस्थित राहतील याची योग्य ती खबरदारी आपण घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

२) आपल्या शाखेत इ.१० वी सेमी.इंग्रजी चालू असल्यास त्याच्या इ.१० वीच्या बीजगणित व भूमिती या विषयाच्या प्रश्नपत्रिका आपल्या विभागीय कार्यालयाकडून आपण प्राप्त करुन घ्याव्यात.

३) सदरच्या सर्व प्रश्नपत्रिका A,B,C,D कोडप्रमाणे असून, बोर्डाच्या धर्तीवर सदरची परीक्षा घ्यावयाची आहे याची नोंद घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

४) ही इ.१० वी, १२ वीची विशेष सराव परीक्षा झाल्यानंतर त्याचा निकाल आठ दिवसाचे आत तयार करावा. इ.१० वी, १२ वी इंग्रजी विषयाची २० गुणांची तोंडी परीक्षा ही लेखी परीक्षे अगोदर घेऊन त्यासह १०० गुणांचा निकाल तयार करावा. तो आपले विभागीय कार्यालयाकडे त्या त्या वेळी ताबडतोब पोहोच होईल अशा रीतीने पाठवावा.

५) सदरचे परिपत्रक **www.rayatshikshan.edu** संस्था वेबसाईटवर माहितीसाठी व आपण आपल्या शाखेत करावयाच्या कार्यवाहीसाठी उपलब्ध आहे

कळावे.

(श्री. विलास महाडीक)
**सहसचिव(माध्य.),**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :

१. सर्व इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था.
(टीप :- आपण सदरच्या A,B,C,D कोडप्रमाणे (शाखावाईज/गटवाईज) आपणाकडे आलेल्या प्रश्नपत्रिका आपल्या विभागातील सर्व शाखांना वेळेत पोहोच करण्याची कार्यवाही करावी. तसेच त्याची खात्री करावी.)

२) श्री.मुख्याध्यापक (गटप्रमुख)
(आपण विभागीय कार्यालयाच्या सूचनेप्रमाणे प्रश्नपत्रिका संबंधित शाखांना वेळेत देण्याची व्यवस्था करावी.)

३) श्री.व्यवस्थापक,रयत प्रिंटीग प्रेस,सातारा

४) श्री.व्यवस्थापक,रयत प्रिंटींग प्रेस,अहमदनगर